**ठळक बातम्या**

- देशाचे १५वे उपराष्ट्रपती म्हणून सी. पी. राधाकृष्णन यांनी घेतली शपथ

- युपीआयच्या माध्यमातून सोमवारपासून दिवसाला १० लाखापर्यंतचे व्यवहार करता येणार

- ब्राझिलचे माजी अध्यक्ष बोल्सेनारो निवडणुकीतल्या गैरप्रकार प्रकरणी दोषी, सर्वोच्च न्यायालयाने सुनावला २७ वर्षांचा कारावास

आणि

- डेव्हिस चषक टेनिस स्पर्धेत भारत आणि स्वित्झर्लंड यांच्यातले सामने आजपासून

<><><><>

देशाचे १५वे उपराष्ट्रपती म्हणून सी. पी. राधाकृष्णन यांनी आज पदाची शपथ घेतली. नवी दिल्लीच्या राष्ट्रपती भवनात झालेल्या समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राधाकृष्णन यांना शपथ दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, जगदीप धनखड, हमीद अन्सारी, एम वेंकय्या नायडू हे माजी उपराष्ट्रपती, तसंच अमित शहा, नितीन गडकरी, राजनाथ सिंग, जे.पी.नड्डा, पीयुष गोयल हे केंद्रीय मंत्री आणि इतर मान्यवर शपथविधी सोहळ्याला उपस्थित होते.

उपराष्ट्रपतीपदासाठी झालेल्या निवडणुकीत सीपी राधाकृष्णन यांनी प्रतिस्पर्धी इंडिया आघाडीचे उमेदवार बी सुदर्शन रेड्डी यांचा १५२ मतांनी पराभव केला. उपराष्ट्रपतींनी आज राज्यसभेच्या अध्यक्षपदाचा कार्यभारही स्वीकारला.

<><><><>

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा करातल्या नव्या सुधारणांतर्गत सरकारने सर्वसामान्यांना उपयुक्त अशा अनेक वस्तूंना करातून सूट देऊन एक महत्त्वपूर्ण पाऊल उचललं आहे. या नवीन कररचनेनुसार, काही आवश्यक वस्तूंवरचा जीएसटी शून्य करण्यात आला आहे. यात अति-उच्च तापमानाचं दूध, प्री-पॅकेज अन्नपदार्थ, ब्रँडिंग न केलेले तांदूळ,

गहू आणि डाळी तसंच, सर्व प्रकारचे ब्रेड यांचा समावेश आहे. वैयक्तिक आयुर्विमा आणि आरोग्य विम्याच्या हप्त्यालाही जीएसटीमधून सूट देण्यात आली आहे.

<><><><>

वाहन क्षेत्रातल्या जीएसटी सुधारणांमुळे त्यातल्या टायर, बॅटरी, काच, स्टील, इलेक्ट्रॉनिक्स अशा विविध सहाय्यक उद्योगांना फायदा होणार आहे. या नव्या सुधारणांनुसार ३५०सीसी पर्यंतच्या बाईक्स, बसेस, चारचाकी गाड्या, १८०० सीसीपेक्षा कमी इंजिन क्षमतेचे ट्रॅक्टर आणि विविध सुट्या भागांच्या किंमतीत घट होणार आहे. पर्यायाने वाहन विक्री वाढून त्यामुळे पुरवठा साखळीतल्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना चालना मिळणार आहे. ऑटोमोबाईल क्षेत्रामुळे उत्पादन, विक्री, वित्तपुरवठा आणि देखभालीसारख्या विविध घटकांमधे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होते. जीएसटी सुधारणांमुळे मागणी वाढणार असून चालक, मेकॅनिक आणि वाहनाशी संबंधित इतर सेवा देणाऱ्या क्षेत्रांमध्येही रोजगार निर्मिती होणार आहे.

<><><><>

एन पी सी आय नं व्यक्ती ते व्यापारी या प्रकारातल्या युपीआय व्यवहारांची मर्यादा दहा लाख रुपयांपर्यंत वाढवली आहे. येत्या १५ तारखेपासून हा बदल लागू होईल. मोठ्या रकमेच्या व्यवहारांवर मर्यादा असल्यामुळे ग्राहकांना व्यवहार विभाजित करून, किंवा धनादेश, बँक ट्रान्सफर यांसारख्या पारंपरिक पद्धती वापराव्या लागत होत्या, अशा क्षेत्रांना या निर्णयामुळे लाभ होणार आहे. मात्र, व्यक्ती ते व्यक्ती व्यवहारांची मर्यादा १ लाख रुपये प्रति दिवस अशी पूर्वीप्रमाणेच कायम राहणार आहे. इतर क्षेत्रातही युपीआय व्यवहाराची मर्यादा वाढवण्यात आली आहे. भांडवली बाजार आणि विमा क्षेत्रात गुंतवणूक मर्यादा प्रति व्यवहार २ लाखांवरून ५ लाख रुपये, तर ई-मार्केटप्लेसवरील शासकीय व्यवहार मर्यादा १ लाखांवरून ५ लाख रुपये करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे यूपीआयच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड बिल भरणा आता प्रति दिवस ५ लाख रुपयांपर्यंत करता येणार असून, सोने-चांदी दागिने खरेदी आता १ लाख रुपयांऐवजी २ लाख रुपयांपर्यंत करता येणार आहे. या सुधारित मर्यादांमुळे विविध महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये उच्च-मूल्य व्यवहारासाठी यूपीआय अधिक उपयुक्त ठरेल आणि यामुळे देशातल्या डिजिटल व्यवहारांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ होईल, असा विश्वास एन सी पी आय ने व्यक्त केला आहे.

**<><><><>**

छत्तीसगढमध्ये आज सुरक्षा दलं आणि माओवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत दोन माओवादी ठार झाले. बिजापूर जिल्ह्याच्या नैऋत्य भागात माओवादी असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी शोधमोहीम सुरू केली. या शोधमोहिमेवेळी माओवाद्यांकडून गोळीबार सुरू झाला. त्याला प्रत्युत्तर देताना झालेल्या चकमकीत दोन माओवादी ठार झाले. घटनास्थळावरून एक रायफल आणि स्फोटकंही जप्त करण्यात आली असून शोधमोहीम अजूनही सुरू आहे.

**<><><><>**

ब्राझिलचे माजी अध्यक्ष जेयर बोल्सेनारो यांना २०२२ मधे निवडणुकीत गैरप्रकार केल्याबद्दल दोषी ठरवलं आहे. तिथल्या सर्वोच्च न्यायालयाने त्यांना २७ वर्ष आणि ३ महिन्यांचा कारावास सुनावला आहे. न्यायालयं विसर्जित करणं, लष्कराला अनिर्बंध अधिकार देणं, निवडून आलेल्या राष्ट्राध्यक्षाच्या हत्येचा कट रचणं, इत्यादी आरोप त्यांच्यावर होते. ७० वर्षांचे बोल्सेनारो यांच्याबरोबरच ब्राझिलचे तत्कालीन संरक्षण मंत्री आणि नौदल प्रमुख यांच्यासह ६ जणांना न्यायालयानं दोषी ठरवलं आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांचा बोल्सेनारो यांना पाठिंबा होता. त्याबद्दलही ब्राझिलच्या सर्वोच्च न्यायालयानं ताशेरे ओढले आहेत.

**<><><><>**

दहशतवादाविरोधात काम करणाऱ्या भारत - फ्रान्स संयुक्त कार्य गटाची १७वी बैठक काल फ्रान्समधे पॅरिस इथं झाली. परराष्ट्रव्यवहार विभागाचे संयुक्त सचिव के टी देवल यांनी भारताचं तर फ्रान्सचे राजदूत ऑलिव्हिए कॅरों यांनी फ्रान्सचं प्रतिनिधित्व केलं. बैठकीत पहलगाम हल्ल्याचा निषेध करण्यात आला. सीमापार दहशतवाद आणि दहशतवादी संघटनांच्या कारवायांना काही देशांकडून मिळणारं पाठबळ, दहशतवाद्यांकडून प्रगत तंत्रज्ञानाचा वापर, तसंच अतिरेकी विचार आणि उग्रवाद यांचा सामना करण्याबाबत या बैठकीत विस्तृत चर्चा झाली. या कार्यगटाची १८वी बैठक भारतात घेण्यावर बैठकीत सहमती झाली.

**<><><><>**

कतारची राजधानी दोहा इथं इस्राइलनं मंगळवारी केलेल्या हल्ल्याचा संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेनं निषेध केला आहे. सुरक्षा परिषदेतल्या अमेरिकेसह सर्व १५ सदस्यांनी हा निषेध केला. हमासच्या नेत्यावर हा हल्ला झाला होता, त्यात हमासचे ५ सदस्य ठार झाले मात्र वरिष्ठ नेता बचावला. कतारच्या सुरक्षा दलातल्या एका जवानाचाही यात मृत्यू झाला.

<><><>

नेपाळमध्ये युवावर्गाच्या उठावानंतर नेपाळचे अध्यक्ष रामचंद्र पौडेल तसंच लष्करप्रमुख यांची युवावर्गाच्या प्रतिनिधींबरोबरची चर्चा अद्याप सुरू आहे. नेपाळच्या हंगामी सरकारचे प्रधानमंत्री ठरवण्यासाठी ही चर्चा गेले दोन दिवस सुरु आहे. ही चर्चा आज सकाळी पुन्हा सुरु झाली आहे.

सध्याच्या परिस्थितीत कोणताही मार्ग हा घटनेच्या चौकटीतच काढला जायला हवा यावर नेपाळचे लोकसभा अध्यक्षांनी यांनी काल चर्चेदरम्यान भर दिला. त्यामुळे संसद विसर्जित करावी किंवा नाही यावर निर्णय होऊ शकला नाही.

<><><>

पंजाबच्या फाजिल्का जिल्ह्यात शस्त्रांचा मोठा साठा आज पकडण्यात आला. त्यात सोळा पिस्तुलं, १ हजार ८४७ जिवंत काडतूसं यासह इतर गोष्टींचा समावेश आहे. पंजाब पोलिस आणि सीमा सुरक्षा दल यांनी काल रात्री सीमेवरच्या फाजिल्का गावात ही कारवाई केली.

<><><>

येत्या काळात भारताला जगातल्या क्रीडा क्षेत्रातल्या आघाडीच्या १० देशांमध्ये घेऊन जाण्याचं सरकारचं लक्ष्य असल्याचं प्रतिपादन केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडवीय यांनी केलं आहे. त्यासाठी १० वर्षांचा आणि २५ वर्षांचा आराखडा तयार केला असून लवकरच त्याची अंमलबजावणी सुरू होईल. तसंच त्याच्यासाठी आवश्यक धोरणात्मक बदल केले जातील, अशी माहिती त्यांनी दिली. नवीदिल्लीत एका खासगी परिषदेत ते बोलत होते.

<><><>

डेव्हिस चषक टेनिसस्पर्धेत भारत विरुद्ध स्वित्झर्लंड सामने आजपासून स्वित्झर्लंडमधे बायल इथं सुरु होत आहेत.  भारताचा अग्रणी खेळाडू सुमीत नागल कडून एकेरीमधे चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे. आर्यन शाह आणि दक्षिणेश्वर सुरेश हे दोघे ही एकेरीत खेळणार आहेत. दुहेरीत एन श्रीराम बालाजी आणि ऋत्विक चौधरी बोलिपल्ली भारताचं प्रतिनिधित्व करतील.

**<><><><>**

फिडे ग्रँड स्विस बुद्धिबळ स्पर्धेत भारताचा ग्रँडमास्टर निहाल सरीन यानं इराणच्या परहम मगसूदलू वर विजय मिळवत साडेपाच गुणांची कमाई केली आहे. भारताच्या अर्जुन एरगेसीला हरवणाऱ्या जीएम मॅथियास ब्लूबॉम शी त्याने बरोबरी केली आहे.

महिला विश्वविजेती दिव्या देशमुखला या स्पर्धेत वाईल्डकार्डद्वारे प्रवेश मिळाला असून गुकेशचा पुढचा सामना तिच्याबरोबर होणार आहे.

**//<><><><>//**